Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Oct. 2022 Issue - 60 Vol. 1

Editor In Chief
Mr.Arun B. Godam

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli.

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 47. | भारतीय लोकशाही समोरील समकालीन समस्या आणि आव्हाने<br>प्रा.डॉ.पांडुरंग खं. नेवरकर | 157 |
| 48. | राष्ट्रीय राजकारणातील घटक म्हणुन उदय पावलेली राज्ये आणि त्यांचा मर्यादा.<br>डॉ. अंकुश अंबादासराव चव्हाण | 160 |
| 49. | भारतीय लोकशाही आणि नागरिकांची भूमिका– एक अभ्यास.<br>प्रा.डा.देविदास ग्यानुजी नरवाडे | 163 |
| 50. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>शिंदे नितीन लक्ष्मणराव | 167 |
| 51. | लोकशाहीतील प्रसार माध्यमांची भूमिका व महत्व<br>डॉ. मोगले राजेश दत्तात्रय | 170 |
| 52. | भारतीय लोकशाहीची वाटचाल<br>सुभाष किसनराव पोले | 172 |
| 53. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>प्रा. विकास दशरथ वाघमारे | 177 |
| 54. | भारतीय लोकशाही तत्व आणि व्यवहार<br>डॉ. अर्जुन येरगे | 180 |
| 55. | लोकशाहीचा तात्वीक विचार व कार्यपद्धती<br>बालाजी जांवुतकर | 182 |
| 56. | भारतीय लोकसंख्या वाढ : लोकशाहीपुढील प्रमुख्य समस्या<br>गणेश नामदेव घोडेकर | 186 |
| 57. | लोकशाही : लोकशाहीसाठी आवश्यक परिस्थिती<br>अनिल नारायणराव पंडित | 188 |
| 58. | भारतीय लोकशाही आणि हिंदू कोड बील<br>सिमला बन्सीधर तुपसमिंद्रे | 190 |
| 59. | भारतीय लोकशाही व महिला<br>उषा देवराव किरवले. | 193 |
| 60. | शास्वत विकास इक्कीसवीं सदी की नई चुनौतियां<br>डॉ.कांबळे सुनील सोजरराव | 197 |
| 61. | 'खेळातील विकृत राजकारण रोखणे हे भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान'<br>Dr. Gunaji P. Nalge | 199 |
| 62. | भारतीय लोकशाही आणि समाज माध्यमे<br>डॉ. जाधव बप्पा संभू | 201 |
| 63. | क्रीडेच्या माध्यमातून लोकशाही मूल्यांची जोपासना<br>डॉ. संदीप चा. लोंढे | 204 |



Shivaji College of Art's Hingoli
PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli.

Scanned with CamScanner

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 60 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2022 | SJIF | Impact Factor : 7.139

# भारतीय लोकशाही आणि समाज माध्यमे

डॉ. जाधव बप्पा संभू
सहाय्यक प्राध्यापक, मानसशास्त्र विभाग
शिवाजी महाविद्यालय हिंगोली (महाराष्ट्र)

---

जगातील शक्तीशाली देशापैकी भारत हा एक देश आहे. आज भारताला स्वातंत्र्य मिळून जवळ जवळ सत्तर वर्षाहून अधिक काळ झालेला आहे. लोकशाहीच्या दृष्टीकोणातून जर विचार केलातर भारत देश लोकशाही मध्ये सर्वात मोठा असून आंतरराष्ट्रीय समुदायाने त्याची दखल घेतलेली आहे. आजच्या घडीला भारत बऱ्याच वस्तु दुसऱ्या देशात निर्यात करत आहे, आयात होणाऱ्या वस्तूंचे उत्पादन आपल्या देशात कसे करता येईल यासाठी प्रयत्न देखील करत आहे. भारताच्या या लोकशाहीमुळेच जगात भारताचे नाव हे घेतल्या जात आहे, याचे एक कारण असेही सांगता येईल की भारताचे ध्येय धोरणे हे लोकशाहीच्या अनुषंगाने आखली जातात व त्याची अमलबजावणी देखील केली जाते. सामाजिक आर्थिक आणि राजकीय आव्हानाला तोंड देत असलेल्या व्यक्ती मधील मानवी हक्काचे संरक्षण लोकशाही मध्ये समाविष्ट आहे. आर्थिक वाढीसाठी आवश्यक प्रेरणा वाढविण्याचे साधन म्हणून अधिकाऱ्यांनी त्यांच्या नागरिकांच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करणे अपेक्षित आहे. पारंपरिकपणे लोक त्यांचे लोकशाही अधिकार शिकण्यासाठी लिखित सामग्रीवर अवलंबून असतात इतर लोक हे लोकशाही बद्दल माहिती मिळवण्यासाठी टेलिव्हिजन आणि रेडिओ स्टेशनवरील दैनंदिन बातम्यावर अवलंबून असतात. असे असले तरीही जेवढी लोकशाही मोठी तेवढे तिच्या समोरील समस्या व आव्हाने ही मोठे असतात.

भारतीय लोकशाही पुढील समस्या व आव्हाने याचा विचार जर केला तर आज आपणास बऱ्याच समस्या व आव्हाने हे दिसून येतील जसे, वाढती लोकसंख्या, गरीबी, भ्रष्टाचार,हिंसाचार, दहशतवाद, नक्षलवाद, शिक्षण, स्वच्छता, मतदानाची कमी टक्केवारी, इत्यादि सोबतच अजून एक ज्याकडे लोकशाही समोरील समस्या किंव्हा आव्हान म्हणून देखील पाहता येते, तो घटक म्हणजे समाज माध्यमे हा होय. सोशल मीडिया ही संवादाची एक पद्धत आहे जी लोकांशी संवाद साधण्यासाठी इंटरनेट किंव्हा मोबाइल फोन वापरते त्याद्वारे आपण जगभरातील लोकांना संदेश आदान प्रदान करू शकतो. हा सामाजिक संप्रेषण मोड अनेक देशांनी वापरायला सुरुवात केली आहे, आणि नागरिकाना त्यांच्या लोकशाही अधिकारांचा वापर करण्यास व संवाद साधण्यास सक्षम केले आहे. इथे उदाहरण द्यायचे झाल्यास अमेरिकेचे देता येईल, माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी नगरिकांसोबत संवाद साधण्यासाठी आणि अधिक समर्थन मिळविण्यासाठी सोशल मीडियाचा वापर भरपूर प्रमाणात केलेला दिसून येतो.

आज तंत्रज्ञानाचे / संगणकाचे युग आहे. त्यामुळे बरीच लोकही तंत्रज्ञानाचा वापर दैनंदिन जीवनात करतात. आज इंटरनेट मुळे जग फार झपाट्याने गतीने पुढे जात असताना आपणास दिसत आहे. यातच तरुणांच्या हातात इंटरनेटच्या मदतीने समाज माध्यमे वापरताना दिसत आहेत आणि त्याचे वापराचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

एका जागतिक अभ्यासानुसार जगाची लोकसंख्या ७.९ अब्ज आसून यात ३.५ अब्ज स्मार्टफोन वापरकर्ते, ४.६६ अब्ज इंटरनेट वापरकर्ते आणि ३.९६ अब्ज सोशल मीडिया वापरकर्ते आहेत.

साधारणतः २०१४ पासून भारतात राज्यातील व केंद्रातील निवडणुकांमध्ये प्रचार व प्रसार करण्यासाठी सोशल मीडियाचा वापर होऊ लागला. ही समाज माध्यमे म्हणजे फेसबुक, व्हाट्सअप,ट्विटर, यूट्यूब, इत्यादि होत. आधुनिक काळात निवडणुका मधील उमेदवार आपला प्रचार हा या सोशल मीडियाच्या द्वारे करतांना दिसून येत आहे. याचा फायदा म्हणजे कमीतकमी वेळेत असंख्य लोकांपर्यंत पोहचता येते. याच सुमारास ५अब्ज भारतीय रुपये त्यावर्षी डिजिटल प्लॅटफॉर्मवर राजकीय जाहिरातीवर खर्च करण्यात आले आहेत. यावरून हे लक्षात घेण्यासारखे आहे की निवडणूक आणि सोशल मीडिया यांचा धनात्मक संबंध आहे.

भारतीय लोकशाहीत माध्यमांची भूमिका-

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli Dist.Hingoli.

Scanned with CamScanner

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 60, Vol. 1<br>Oct. 2022 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

समाज माध्यमांनी राजकीय पक्षांना मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि त्यांना धोरणांपासून निवडणुकीपर्यंतच्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर माहिती देण्याची विविध साधने उपलब्ध करून दिली आहेत. प्रसारमाध्यमांकडे लोकशाहीचे सहाय्यक म्हणून पाहिले जाऊ शकते; अधिक सुशिक्षित मतदार असल्याने अधिक वैध सरकार निर्माण होईल अशी धारणा असते.

भारतातील एका संशोधनात असे दिसून आले आहे की फेसबुकच्या माध्यमातून द्वेषपूर्ण भाषण, चुकीची माहिती, एखाद्या विशिष्ट समुदायाविषयी हिंसाचाराचा प्रसार करण्यासाठी केला जात आहे. २०२० मध्ये वॉल स्ट्रीट जर्नलच्या तपासणीत असे दिसून आले होते की फेसबुक या प्लॅटफॉर्मवर विशिष्ट समाजाबद्दल निंदनीय मजकूर दिसून आला, तो बराच काळ तसाच राहू दिला, ज्यावेळी असोसिएशन फॉर प्रोग्रेसिव्ह कम्युनिकेशन या संस्थेसह नागरिकांनी अनेक तक्रारी केल्या तेव्हा त्या द्वेषयुक्त भाषण व मुजकूर यांचे ऑडिट करा व सामग्रीवर त्वरित कारवाई करा अशी मागणी केली गेली. प्रथमत: फेसबुक ने या घटनेकडे दुर्लक्ष केले, मात्र न्यायालयाच्या आदेशानंतर फेसबुकला समितीसमोर हजर राहण्याशिवाय पर्याय उरला नाही. अशा काही घटनामुळे लोकशाही संदर्भात समस्या निर्माण होऊ शकतात. मानवाधिकार उच्चायुक्त कार्यालयाने निदर्शनास आणल्याप्रमाणे माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा लोकसहभागावार नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

जेव्हा अशा प्लॅटफॉर्मवर चुकीची माहिती आणि प्रसार पसरला जातो तेव्हा लोकसंख्येची दिशाभूल होते. उदा- साथीचा आजार चालू असताना एका विशीष्ठ जातीला लक्ष केले होते, समाज माध्यमावर त्यांच्या विषयी जाणूनबुजून चुकीची माहिती दिली जात होती की त्यांच्यामुळेच हा साथीचा आजार पसरत आहे. अशा गोष्टीमुळे समाजात अस्थिरता निर्माण झाली होती त्याचे मुख्य कारण म्हणजे सोशल मीडियावरील चुकीची माहिती, अशी सामाजिक अस्थिरता लोकशाहीला कमजोर करू शकते.

बऱ्याच राजकीय पक्षाचे स्वतःचे टीव्ही चैनल आहेत, तर काहींचे स्वतःचे आयटी सेल तयार आहेत ज्याद्वारे ते समाजात पोस्ट पसरवत असतात तर काहींचे चैनलवाल्या सोबत आर्थिक संबंध असतात. या मुळे अशा चैनलवर ज्या रोकठोक मुलाखती घेतल्या जातात, त्यामधून प्रक्षोभक भाषेचा वापर केला जातो. अगदी काहीवेळेस खालच्या पातळीवरील शब्दप्रयोगाचा देखील वापर केला जातो, यातून समाजा-समाजात तेढ निर्माण होते. अशा वक्तव्याचा समाजातील लोकांच्या मानसिकतेवर परिणाम होऊ शकतो.

कोव्हिड-१९ या साथीच्या आजाराने हे दाखवून दिले आहे की सोशल मीडिया सामान्य नागरिकांना कसा मदत करू शकतो आणि संकटाचा सामना करण्यासाठी सरकार यांच्या प्रयत्नांना पूरक ठरू शकतो. जगभरात सोशल मीडिया लोकांसाठी सरकारांविरोधात आवाज उठवण्या करिता उपयोगी ठरत आहे. समस्येवर चर्चा करणे कारणाभोवती संघटित करणे, आणि नेत्यांना जबाबदार धरणे, तथापि त्यांच्या अनियंत्रित स्वरूपामुळे आणि खोट्या बातम्यांच्या प्रसारामुळे / भूमिकेचा सोशल मीडियामुळे प्रसार होतो. अशाप्रकारे भाषण स्वातंत्र्य अल्पसंख्याकांचे हित, कायदा आणि सुव्यवस्था, आणि प्रशासनात नागरिकांची सहभागाला चालना देणारे संतुलन राखण्यासाठी सोशल मिडियावर नियमन करण्याची गरज आहे. आज समाजात सोशल मीडियाच्या माध्यमातून काही हॅशटॅग वापरुन अभासी चळवळ/ मोहीम राबविल्या जातात. ज्यातून आपले मत मांडण्याचा प्रयत्न होत असतो.

**सोशल मीडिया चा लोकशाही वर सकारात्मक प्रभाव**

- डिजिटल लोकशाही:- लोकांमध्ये अभिव्यक्तिस्वातंत्र्य असेल तेव्हा लोकशाही मूल्ये विकसित होऊ शकतात अशा प्रकारे सोशल मीडिया स्वातंत्र्याच्या या व्यासपीठाद्वारे डिजिटल लोकशाहीची संकल्पना सक्षम करते.
- उत्तरदायित्व निश्चित करणे:- सोशल मीडिया हे एक साधन म्हणून काम करते जेवर अजिंक्य वाटणाऱ्या सरकारावर प्रश्न चिन्ह उभे करु शकते त्याला जबाबदार बनवू शकते आणि वर्षानुवर्षे एका महत्त्वाच्या पलीकडे लोकांनी चालवलेले शाश्वत बदलही घडून आणू शकते. म्हणून नागरिक या नात्याने आपले आपल्या समाजाप्रती लोकशाहीचे मूल्ये जपण्याकरिता उत्तरदायित्व निश्चित करणे गरजेचे आहे. हे केलेतर आपण आपली लोकशाही अजून बळकट बनवू शकतोत.

**सोशल मीडिया चा लोकशाही वर होणारा नकारात्मक प्रभाव**

- राजकीय ध्रुवीकरण:- सोशल मीडियावरील सर्वात सामान्य ठिकापैकी एक म्हणजे ते इको चेंबर्स तयार करतात जिथे लोक फक्त त्यांच्याशी सहमत असलेले दृष्टिकोन पाहतात. लोक या माध्यमातून त्यांचे राजकीय ऊर्जा वापरात असल्याचे त्याचा वापर सामाजिक परिणामांसह अनपेक्षित मार्गाने केला जात आहे ज्यांचा कधी अंदाज आला नव्हता.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli.

Scanned with CamScanner

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 60 , Vol. 1 Oct. 2022 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

- फेक न्यूज:- सोशल मीडियाच्या माध्यमातून राजकीय पक्षाशी संबधित लोकं बनावट बातम्या तयार करतात व त्या सत्य आहेत असे भासविले जाते. या बनावट बातम्यांच्यातून आपली व पक्षाची प्रतिमा उंचवण्याचा प्रयत्न केला जातो. फेक न्यूज द्वारे कधीकधी कोणीही फसवणूक आणि चुकीची माहिती पसरविण्यासाठी वापर करू शकतो.
- निवडणुकीसंदर्भात जनमत चाचणी :- आज निवडणूक मग ती राज्यातील असो व केंद्रातील असो सर्व सोशल मीडियाच्या प्लॅटफॉर्मवर स्पर्धा लागलेली दिसून येते. आम्ही केलेली जनमत चाचणीच योग्य आहे, याचे प्रसारण अगदी दिवसभर प्रदर्शित केले जाते. या जनमत चाचणीचा एक दोष असा असू शकतो की एखाद्या व्यक्तीच्या मनात एखाद्या पक्षाविषयी किंवा उमेदवारा विषयी जर मत चांगले असेल, मात्र जनमत चाचणीचा जर या व्यक्तीने खोलवर विचार केला तर त्याचे मतपरिवर्तन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सारांश :-

थोडक्यात भारतीय लोकशाही ही सर्वात मोठी असल्याने सर्व कामकाज हे लोकशाही पद्धतीने चालते. आज या आधुनिक युगात वावरत असताना रोज नवनवीन तंत्रज्ञान हे विकसित होत आहे. आलेल्या नवीन तंत्रज्ञानाचा परिणाम हा प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक,राजकीय,व वैयक्तिक जीवनावर होत असतो. आज जवळपास सर्वच व्यक्ति या सोशल मीडियाचा वापर करत आहे, म्हणून सोशल मीडियावर कंटेंट शेअर करताना सावधगिरी बाळगली जावी. आपण पाठविलेल्या पोस्ट या समाजात तेढ निर्माण होऊ शकते, यासाठी नेहमी आपण सावधगिरी बाळगली पाहिजे. सोशल मीडियावर आपण पाठविलेल्या समाजविरोधी पोस्ट मुळे जेल होऊ शकते, याची जाणीव सर्वांना असायला हवी. बऱ्याच लोकांना आजूनही डिजिटल गुन्हा या विषयी परिपूर्ण माहिती नसते, म्हणून आपण डिजिटली साक्षर होणे गरजेचे आहे. त्याच बरोबर आपण समाज माध्यमे यांचा ज्या-ज्या वेळेस वापर करणार त्या-त्या वेळेस सामाजिक भान ठेऊन व सदसदविवेकबुद्धी चा विचार करून त्याचा वापर करावा, जेणेकरून आपली लोकशाही ही अधिक बळकट होईल.

संदर्भ :


1. Restofworld.org
2. Role of Social Media in Democracy - Drishti IAS https://www.drishtiias.com ›
3. StudyCorgi. (2022, February 1). *The Influence of Social Media on Democracy*. Retrieved from https://studycorgi.com/the-influence-of-social-media-on-democracy/
4. IvyPanda. (2020, April 17). *Social Media and Democracy*. https://ivypanda.com/essays/social-media-and-democracy/
5. www.google.com
6. https://www.researchgate.net/publication/342162878_ROLE_OF_SOCIAL_MEDIA_IN_THE_CHANGING_FACE_OF_INDIAN_POLITICS_A_STUDY_WITH_SPECIAL_REFERENCE_TO_FACEBOK


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli.

Scanned with CamScanner

Shivaji College of Art's Hingoli

Shri.Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# SHIVAJI COLLEGE, HINGOLI

आज़ादी का अमृत महोत्सव

Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

Organized by Department of Political Science

## One Day Interdisciplinary National Conference

**on**

## Contemporary Issues and Challenges for Indian Democracy

Wednesday, 19 October 2022 SCH/conference/2022-23/62

## Certificate

*This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs.* जाधव बप्पा संभू

*from* शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

*has participated the Conference as Inaugurator / Keynote Speaker / Chairperson / Chief Guest / Subject Expert / Participant on 19 October 2022. He / She has presented a research paper entitled* भारतीय लोकशाही आणि समाज माध्यमे

| | | | |
|---|---|---|---|
| Principal | Vice-Principal | Convener | Organizing Secretary |
| Dr. B. G. Gaikwad | Dr.Balasaheb S. Kshirsagar | Dr.Sukhnandan U. Dhale | Dr.Rambhau B. Bhakare |

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli.

Scanned with CamScanner